# ॥ डॉ. विजय भटकर ॥

डॉ. विजय भटकर, ६३, हे जागतिक कीर्तीचे परम संगणक तज्ज्ञ व प्रख्यात शास्त्रज्ञ आहेत. अमेरिकेने भारताला महासंगणक देण्याचे नाकारल्यानंतर त्यावेळचे पंतप्रधान मा. राजीव गांधी यांनी केलेले आवाहन स्वीकारून परमश्रेणीतल्या महा संगणकाची निर्मिती करून भारताला जगात भूषविणारे डॉ. विजय भटकर परम महासंगणकाचे जनक म्हणून सर्वश्रुत आहेत.

आपल्या बहुभाषिक देशात संगणकावर मायबोलीत लिहिता वाचता यावे म्हणून त्यांनी बहुभाषिक **GIST** हे तंत्रज्ञान भारताला उपलब्ध करून दिल्याने आज आपण भारताच्या अनेक भाषा संगणकावर पाहू शकत आहोत.

लक्षावधी घरांमध्ये तसेच शाळांमध्ये आयसीटी ( इन्फॉरमेशन व कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी ) पोहोचविण्याच्या उद्देशाने त्यांनी eth ( education to home ) ही संस्था उभी केली व आयसीटी १०००० या प्रकल्पाद्वारे येत्या दोन वर्षात भारतातील १०००० शाळांना संगणकीय शाळेचे रूप देणे (digital school) तसेच लाखो विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साह्याने ज्ञान, विज्ञान व कला संपादन करता यावे म्हणून वैश्विक ज्ञान पोर्टलची निर्मिती करण्याचा संकल्प केला आहे.

भारतीय तीर्थक्षेत्रांना वैश्विक ज्ञानाची क्षेत्रे बनविण्याचा सद्संकल्प करणारे डॉ. भटकर यांनी विज्ञान व अध्यात्म याची सुंदर सांगड घातली आहे. अध्यात्माला विज्ञानाची जोड तसेच विज्ञानाला अध्यात्माची जोड दिल्याने भारत विश्वगुरु होईल असा त्यांचा ठाम विश्वास आहे. म्हणून त्यांनी भारत विश्वज्ञानपीठ (India International Multiversity) ह्याची सांकल्पिक प्रतिष्ठापना करून त्याला संस्थात्मक रूप दिले आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना भाषा, विज्ञान, अध्यात्म व संस्कृती अश्या अनेक ज्ञान शाखांचा सखोल अभ्यास करता येणे शक्य झाले आहे.

डॉ. विजय भटकर यांची आतापर्यंत १२ पुस्तके व ८० निबंध प्रसिद्ध असून हे साहित्य यूरोप, अमेरिका व भारतातल्या अनेक विद्यापीठांमध्ये अधिकृत म्हणून वापरले जाते. राष्ट्रीय पातळीवरील अनेक संस्थांची रचना त्यांनी केली आहे. उदा. C-DAC, ER &DC त्रिवेंद्रम येथील R&D सेंटर , पुणे येथील $I^2$IT, IIMV इ.

डॉ. विजय भटकर यांच्या निरनिराळ्या शोध, उपक्रम व आयटी क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना जागतिक इलेक्ट्रॉनिक्स व संगणक क्षेत्रातील सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या संस्था IEEE व ACM यांनी ‘ फेलो ‘ या अत्युच्च पदवीने पुरस्कृत केले आहे.

डॉ. विजय भटकर यांच्या कर्तृत्वाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना सर्वोच्च नागरी महाराष्ट्र भूषण तर केंद्र शासनाने पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

एक आदर्श वैज्ञानिक, तत्त्वाज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, समाज प्रबोधक म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॉ. विजय भटकर यांच्या व्यक्तिमत्वाला विनम्रतेची अनोखी जोड आहे. त्यामुळेच त्यांच्या संपर्कात येणारे अनेक लोक देशकार्यासाठी प्रेरित होऊन आपापल्या क्षेत्रात उत्तुंग शिखरं गाठत आहेत.